मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# शरद पवार गटाला बसणार मोठा धक्का!

## एका पक्षातून दुसरीकडे पक्षप्रवेश : माजी नगरसेवकांचा मोठा गट पक्षातून बाहेर पडणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकारणात बदल सुरु झाले आहेत. एका पक्षातून दुसरीकडे असे पक्षप्रवेश आता पहायला मिळणार आहेत. विधानसभेच्या दरम्यान आमदारकी लढण्यासाठी तुतारीमध्ये आलेले माजी नगरसेवक अजित गव्हाणे यांची टीम यांच्यासह चिंचवड मतदार संघातील राहूल कलाटे हे महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने पक्षातून बाहेर पडणार आहेत.

येत्या १७ जून रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत जाहीर पक्षप्रवेश केला जाणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली. जवळपास २५ नगरसेवकांची टीम १७ जून रोजी हातावर घड्याळ बांधणार आहे. त्यामुळे तुतारी गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांच्यापुढे महापालिका निवडणुकीच्या दृष्टीने मोठे आव्हान उभे आहे. तुतारी गटामध्ये अनेक कार्यकर्ते शहराध्यक्ष यांच्या कार्यावर नाराज आहेत. त्यांची नाराजी दूर झाली नाही तर इतर पक्षात जाण्याची शक्यता आहे.

तुतारी गटातील कार्यकर्त्यांना बळ देण्यासाठी आणि त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी राष्ट्रवादीचे सर्वोच्च नेते पिंपरी-चिंचवड शहरात येणार आहेत. सकाळी ताथवडे येथील हॉलमध्ये शरद पवार यांच्या आढावा बैठक होणार आहे. त्याच दिवशी दुपारी कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृह, भोसरी येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा पक्षप्रवेश कार्यक्रम आहे. एकाच दिवशी राष्ट्रवादीत होणारी ही उलथापालथ शहरातील राजकारणात चर्चेचा विषय होणार आहे.




### शहराध्यक्षांवर पक्षसंघटनेची धुरा

» अनेक वर्षापासून महापालिका निवडणुकीची वाट पाहणाऱ्यांची आता प्रतिक्षा संपली आहे. काही महिने निवडणुकीसाठी शिल्लक राहीले आहेत. प्रत्येक पक्षाच्या शहराध्यक्षांवर पक्ष संघटन, कार्यकर्त्यांमध्ये एकी निर्माण करणे हे काम असते. प्रत्येकाच्या मताचा आदर तेवढाच महत्त्वाचा असतो. मात्र काही पक्षाच्या शहराध्यक्षांवर कार्यकर्त्यांची नाराजी आहे. त्यामुळे पक्षश्रेष्ठींना संवाद साधून ही नाराजी दूर करावी लागते आहे.

---

# पिंपरीच्या 22 वर्षीय इरफानचा विमान अपघातात मृत्यू

## इरफानचा पहिला आणि शेवटचा जॉब : विमान लंडनला उड्डाण घेण्याआधी केला होता आईला फोन

**पिंपरी | प्रतिनिधी**

अहमदाबादहून लंडनला निघालेल्या एअर इंडियाच्या फ्लाइट AI-171 चा टेकऑफनंतर अवघ्या काही मिनिटांत भीषण अपघात झाला. ७०० फूट उंचीवर गेलेले हे विमान मेघानीनगर परिसरात कोसळले, ज्यामुळे २३० प्रवासी आणि १२ क्रू मेंबर्सपैकी केवळ एकजण वाचला.

या दुर्घटनेत एकूण २६५ जणांचा मृत्यू झाला, यात महाराष्ट्रातील १२ जणांचा समावेश आहे. या अपघाताने पिंपरी-चिंचवडमधील शेख कुटुंबावर दुखाचा डोंगर कोसळला आहे. पिंपरी-चिंचवडच्या संत तुकारामनगर येथील २२ वर्षीय इरफान समीर शेख, जो एअर इंडियामध्ये कॅबिन क्रू म्हणून कार्यरत होता, या अपघातात मृत्यूमुखी पडला.

नुकताच बकरी ईद साजरी करण्यासाठी घरी आलेला इरफान तीन दिवस कुटुंबासह होता. टेकऑफपूर्वी त्याने आईशी फोनवर संवाद साधला होता, जो त्याचा शेवटचा संवाद ठरला. या बातमीने कुटुंबीयांना धक्का बसला असून, ते सुन्न झाले आहेत.

इरफानचे पार्थिव ताब्यात घेण्यासाठी त्याची आई आणि भाऊ अहमदाबादला रवाना झाले आहेत. मात्र, डीएनए तपासणीनंतरच पार्थिव सुपूर्द केले जाईल, अशी माहिती इरफानचे काका फिरोज शेख यांनी दिली. ही दुर्घटना पिंपरी-चिंचवडसह संपूर्ण महाराष्ट्रासाठी हृदयद्रावक ठरली आहे.



### अहमदाबादमध्ये नेमकं काय घडलं?

» अहमदाबादमध्ये गुरुवारी दुपारी दीडच्या सुमासार एअर इंडियाचं AI171 हे बोईंग ७८७ श्रेणीतील प्रवासी विमान विमानतळाजवळच्या मेघानीनगर परिसरात कोसळलं. या विमानातील २४२ प्रवाशांपैकी २४१ प्रवाशांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांचाही समावेश होता. त्यात विमानातील सर्व क्रू मेंबर्स आणि दोन्ही वैमानिकांचाही मृत्यू झाला. मात्र, यातून मूळचे लंडनचे असणारे भारतीय वंशाचे नागरिक विश्वास रमेश यांचे प्राण वाचले. विशेष म्हणजे अपघात स्थळाहून विश्वास रमेश स्वत: चालत बाहेर पडले आणि रुग्णवाहिकेत जाऊन बसले.

# महापालिका निवडणुकांचे दिवाळीनंतर ‘फटाके’

## पुणे तसेच पिंपरी-चिंचवडसाठी चार सप्टेंबरपर्यंत अंतिम प्रभाग रचना

**पुणे | प्रतिनिधी**

आगामी महापालिका निवडणुकांसाठी प्रभाग रचना तयार करण्याचा कार्यक्रम नगर विकास विभागाने जाहीर केला आहे. प्रभाग रचनेचे वेळापत्रक गुरुवारी जाहीर करण्यात आले असून, अंतिम प्रभाग रचना चार सप्टेंबरपर्यंत जाहीर होणार आहे. त्यानंतर आरक्षण, आचारसंहिता या सर्व गोष्टी लक्षात घेता पुणे तसेच पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीचे ‘फटाके’ दिवाळीनंतरच फुटण्याची शक्यता आहे.




दिवाळीपूर्वी शाळांच्या सहामाही परीक्षा असतात. निवडणुकीसाठी मतदान केंद्रे तयार करण्यासाठी शाळा तसेच कामासाठी आवश्यक असलेला शिक्षक वर्ग उपलब्ध होणे अवघड आहे. त्यामुळे महापालिकेची निवडणूक दिवाळीनंतरच्या पहिल्या आठवड्यात ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीस अथवा नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात होऊ शकते.

गेल्या तीन ते साडेतीन वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडलेल्या आहेत. महापालिकांमध्ये लोकप्रतिनिधींऐवजी सध्या प्रशासक राज असून, प्रशासनाच्या माध्यमातून कारभार चालविला जात आहे. गेल्या महिन्यात निवडणूक घेण्याबाबत दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेवर निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने चार आठवड्यांत निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्याबरोबरच चार महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रखडलेल्या निवडणुका घ्याव्यात, असे सांगितले आहे. त्यानंतर चार दिवसांपूर्वी राज्य सरकारने प्रभाग रचना करण्याचे जाहीर केले होते. ही प्रभाग रचना कशा पद्धतीने करायची, याचे सविस्तर वेळापत्रक नगर विकास विभागाने महापालिका आयुक्तांना पाठवले आहे.

यामध्ये ११ ते १६ जून दरम्यान प्रगणक गटाची मांडणी करणे, प्रारूप प्रभाग रचना तयार करणे, १७ आणि १८ जून जनगणनेची प्राप्त माहिती तपासणी करणे, १९ ते २३ जून स्थळ पाहणी करणे, २४ ते ३० जून या काळात गुगल मॅपवर प्रभागाचे नकाशे तयार करणे, एक ते तीन जुलै नकाशावर निश्चित केलेल्या प्रभागातील जागेवर जाऊन तपासणे. चार ते सात जुलै प्रारूप प्रभाग रचनेच्या मसुद्यावर समितीने स्वाक्षऱ्या करणे, आठ ते दहा जुलै दरम्यान प्रारूप प्रभाग रचनेचा प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगास पाठविणे, नंतर त्यास राज्य निवडणूक आयोग अथवा आयोगाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडून प्रारूप प्रभाग रचनेला मान्यता दिली जाणार आहे.

महापालिकेने तयार केलेल्या प्रारूप प्रभाग रचना २२ ते ३१ जुलैदरम्यान प्रसिद्ध केल्या जाणार आहे. त्यावर हरकती व सूचना मागविणे, एक ते ११ ऑगस्ट या काळात शासनाने नियुक्त केलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्याने प्राप्त हरकती व सूचनांवर सुनावणी घेणे, १२ ते १८ ऑगस्टदरम्यान सुनावणीनंतर हरकती व सूचनांवरील शिफारसी विचारात घेऊन प्राधिकृत अधिकाऱ्यांनी अंतिम केलेली प्रभाग रचना निवडणूक आयोगास पाठविणे. प्राधिकृत अधिकाऱ्यांनी अंतिम केलेल्या प्रभाग रचनेच्या शिफारशींवर निवडणूक आयुक्त यांनी अंतिम केलेली प्रभाग रचना संबंधित महापालिका आयुक्तांना कळविणे. २९ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर राज्य निवडणूक आयुक्त यांनी अंतिम केलेली प्रभाग रचना अधिसूचनेद्वारे प्रसिद्ध केली जाणार आहे.

राज्य सरकारने तयार केलेल्या वेळापत्रकानुसार ४ सप्टेंबरपर्यंत प्रभागांची रचना जाहीर होणार आहे. ही अंतिम प्रभाग रचना जाहीर झाल्यानंतर निवडणुकीसाठी आरक्षण सोडत होईल. त्यानंतर कधीही महापालिकांच्या निवडणुका होऊ शकतात. शालेय विद्यार्थ्यांच्या सहामाही परीक्षा या शक्यतो दिवाळीपूर्वी असतात. त्यामुळे निवडणूक घ्यायची झाल्यास मतदान केंद्र, मतदान अधिकारी म्हणून शिक्षक आणि इतर कर्मचाऱ्यांना ड्युटी लावणे अडचणीचे होणार आहे. त्यामुळे महापालिकांच्या निवडणुका या दिवाळीनंतर म्हणजेच ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात किंवा नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात होण्याची दाट शक्यता महापालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वर्तवली आहे.

# लाखो वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी पोलिस सज्ज

## पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर देहूरोड पोलिसांकडून चोख बंदोबस्त : सुरक्षेची तयारी

**पुणे | प्रतिनिधी**

आषाढी वारीसाठी संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याची जय्यत तयारी सुरू आहे. या पार्श्वभूमीवर सोहळ्यात सहभागी होणाऱ्या लाखो वारकरी आणि भाविकांच्या सुरक्षेसाठी देहूरोड पोलिसांकडून चोख बंदोबस्त आणि सुरक्षा व्यवस्था केली जात आहे.



दर्शनावेळी चेंगराचेंगरी होऊ नये, यासाठी विशेष व्यवस्था असेल. पालखी प्रस्थान सोहळ्याच्या दिवशी देऊळवाड्यात आणि बाहेरील गर्दीवर दोन ड्रोनच्या साह्याने नजर ठेवण्यात येणार आहे. संत तुकाराम महाराज पालखी सोहळा १८ जूनला पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. भाविकांना आपत्कालीन स्थितीत मदतीसाठी देहूत पोलिस नियंत्रण कक्ष सुरू करण्यात येणार आहेत. इंद्रायणी नदीपात्रात दुर्घटना टाळण्यासाठी बचाव पथक नेमण्यात येणार आहे, अशी माहिती देहूरोड पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक विक्रम बनसोडे यांनी दिली.

"देहूत कायमस्वरुपी पोलिस मदत केंद्र सुरू केले आहे. पालखी सोहळ्यादरम्यान १८ आणि १९ जूनला देहूतील वाहतूक पूर्णपणे बंद; तर पालखी देहूतून मार्गस्थ झाल्यानंतर देहूरोड ते निगडी या दरम्यानची वाहतूक १९ जूनला बंद असेल. देहूत रस्ता रुंदीकरण झाल्याने गर्दीवर नियंत्रण ठेवण्यात मदत होईल. पालखी सोहळ्यात कोणतीही आपत्कालिन परिस्थिती हाताळण्यासाठी खास पथक असणार आहे. पाकीटमार, भुरट्या चोरट्यांना रोखण्यासाठीही पथक तैनात असेल. गावाबाहेर वाहनतळ करण्यात येणार आहे," असेही बनसोडे यांनी सांगितले.

### अवजड वाहनांना देहूत बंदी, पर्यायी मार्ग

» पालखी प्रस्थान दुपारी असल्याने देहूत अवजड वाहनांना बंदी करण्यात येणार आहे. चाकण, तळेगावमार्गे येणारी वाहतूक तळवडेमार्गे जाईल. तसेच १९ जूनला पालखी मार्गस्थ झाल्यानंतर माळवाडी, चिंचोली, देहूरोड ते निगडी दरम्यानची वाहतूक बंद राहील. मुंबईहून येणारी वाहतूक देहूरोड कात्रज बाह्यवळण महामार्गाने जाण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

### असा असेल बंदोबस्त

- एक पोलिस उपायुक्त
- एक सहाय्यक पोलिस उपायुक्त
- बारा पोलिस निरीक्षक
- ४५ सहायक पोलिस निरीक्षक, उपनिरीक्षक
- ३५० महिला आणि पुरुष हवालदार, वाहतूक नियंत्रक पोलिस
- १५० होमगार्ड, ३५ महिला होमगार्ड नेमण्यात येणार आहे.
- एसआरपीएफ, कमांडो फोर्सच्या दोन तुकड्या
- बॉम्ब शोधक व नाशक पथक मुक्कामी

# महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांना मिळणार पाठ्यपुस्तके

## महापालिका शिक्षण विभाग आणि समग्र शिक्षाअंतर्गत पाठ्यपुस्तके देणार आहे, त्यानूसार विद्यार्थ्यांना एक लाख ७० हजार पुस्तके वाटप करण्यात येणार आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

उन्हाळी सुट्या संपल्या असून यंदा १५ जूनपासून नव्या शैक्षणिक सत्र सुरु होणार आहे. त्यामुळे या सत्राच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांच्या हाती महापालिका शिक्षण विभाग आणि समग्र शिक्षाअंतर्गत पाठ्यपुस्तके देणार आहे. त्यानूसार महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना एक लाख ७० हजार पुस्तके वाटप करण्यात येणार आहे.

शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांच्या पटसंख्येनुसार सर्व पुस्तकांची मागणी केली आहे. पुस्तके शिक्षण विभागात आल्यावर त्याचे वाटप विषयतज्ज्ञांकडून केंद्रनिहाय केले जाईल. बालभारतीकडे विद्यार्थी संख्येनुसार मागणी करण्यात आलेली आहे. यानंतर ही पुस्तके प्रत्येक केंद्र प्रमुख तसेच मुख्याध्यापकांकडे पोचविली जाणार असून, विद्यार्थ्यांना सर्व पुस्तके शाळेत पहिल्याच दिवशी हातात देण्यात येतील तसे नियोजन करण्यात आले आहे.

राज्य सरकारकडून दरवर्षी समग्रशिक्षणअंतर्गत महापालिका, अनुदानित, विनाअनुदानित व खासगी शाळांमध्ये पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके वितरित केली जातात. दरवर्षी ही पुस्तके जूनच्या पहिल्या आठवड्यातच शिक्षण विभागाकडे सोपविली जातात. केंद्रनिहाय पुस्तकांचे वितरण करण्यात येते.

महापालिकेच्या अखत्यारीत येणाऱ्या शहरातील शाळांमध्ये नवीन शैक्षणिक सत्र सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या हातात नवी कोरी पुस्तके पडणार आहेत. शालेय साहित्य खरेदी करण्याची महापालिका शिक्षण विभागाची लगबग सुरू आहे.

या सत्राच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांच्या हाती महापालिका शिक्षण विभाग आणि समग्र शिक्षाअंतर्गत पाठ्यपुस्तके देणार आहे. त्यानूसार महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना एक लाख ७० हजार पुस्तके वाटप करण्यात येणार आहे. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या हाती पुस्तके देण्यासाठी शिक्षण विभागाने हे नियोजन केले आहे. समग्र शिक्षा अभियानांतर्गत दरवर्षी महापालिका, अनुदानित, विनाअनुदानित व खासगी शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके दिली जातात. त्यानुसार बालभारतीने पुस्तकांची छपाई केली. शिक्षण विभागाच्या मागणीनुसार बालभारती कडून पिंपरी, आकुर्डी उन्नत केंद्रावर पुस्तके दाखल झाली आहेत. शाळेत विद्यार्थी आल्यावर त्यांचे स्वागत नवी पुस्तके देवून केले जाणार आहे. यामध्ये मराठी, हिंदी आणि उर्दू आणि सेमी इंग्लिश माध्यमांच्या अनुदानित शाळांचा समावेश असतो. यंदा मात्र परिस्थिती सुरळीत असल्याने वेळेत पाठ्यपुस्तके विद्यार्थ्यांना नियोजित वेळेत दिली जातील, अशी माहिती प्राथमिक शिक्षणाधिकारी संगीता बांगर यांनी दिली.



### मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप

» शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांच्या पटसंख्येनुसार सर्व पुस्तकांची मागणी केली आहे. पुस्तके शिक्षण विभागात आल्यावर त्याचे वाटप विषयतज्ज्ञांकडून केंद्रनिहाय केले जाईल. बालभारतीकडे विद्यार्थी संख्येनुसार मागणी करण्यात आलेली आहे. यानंतर ही पुस्तके प्रत्येक केंद्र प्रमुख तसेच मुख्याध्यापकांकडे पोचविली जाणार असून, विद्यार्थ्यांना सर्व पुस्तके शाळेत पहिल्याच दिवशी हातात देण्यात येतील तसे नियोजन करण्यात आले आहे. मुलांना वेळेत पुस्तके मिळावी, असे बालभारतीने देखील नियोजन केले असून, यंदा वहीची पाने देखील पाठ्यपुस्तकात देण्यात आली आहे, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

> “ शहर साधन केंद्राअंतर्गत आकुर्डी केंद्रासाठी वसंतदादा पाटील विद्यालय, तर पिंपरी केंद्रासाठी कर्मवीर भाऊसाहेब पाटील विद्यालय या शाळांमध्ये ही पुस्तके ठेवण्यात आली. या केंद्रांच्या अखत्यारितील शाळांमध्ये पुस्तके वितरित करण्यात आली. त्यानंतर पुस्तकाचे शंभर टक्के वाटप पूर्ण झाले आहे. विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी पुस्तके देण्यात येतील.
>
> **- प्रदीप शिंदे, विषयतज्ञ, शिक्षण विभाग आकुर्डी**

# आयटी पार्कचा वॉटरपार्क झाल्यानंतर पीएमआरडीएची बैठक

## महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांचे निर्देश : हिंजवडीतील प्रश्नांच्या अनुषंगाने घेतली आढावा बैठक

**पिंपरी | प्रतिनिधी**

हिंजवडी परिसरात शनिवारी काही मिनिटे पाऊस पडला आणि आयटी पार्कचा वॉटर पार्क झाला होता. त्यानंतर आता पीएमआरडीएने हिंजवडी परिसरातील समस्यांचे निराकरण करण्यासाठी बैठक घेतली. बुधवारी (दि.११) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी आकुर्डी कार्यालयात आढावा बैठकीत नागरिकांना दिलासा मिळेल, अशा कामांना प्राधान्य देण्याचे निर्देश संबंधित प्रशासकीय यंत्रणांना दिले. यावेळी विविध यंत्रणेच्या अधिकाऱ्यांसह लोकप्रतिनिधींची उपस्थिती होती.

हिंजवडी, मान, मारुंजी यासह इतर काही भागात ठिकठिकाणी पावसाचे पाणी साचत असल्याने वाहनधारकांसह नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. ओढे – नाल्यांतील पाण्याचा प्रवाह रोखल्यामुळे प्रामुख्याने या समस्या पुढे येत आहे. त्यामुळे प्रशासकीय स्तरावरील सर्व यंत्रणांनी सामूहिक प्रयत्न करून ओढे – नाल्यांची स्वच्छता करत रस्त्यावरील डेब्रिज तातडीने उचलून घेण्याचे निर्देश यावेळी महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी दिले. हिंजवडी भागात सुरू असलेल्या मेट्रोसह इतर कामांमुळे रहदारीस अडचणी ठरत आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणेने आपली कामे निर्धारित वेळेत पूर्ण करावीत. यासह नागरी समस्या सोडवण्याच्या दृष्टीने सर्व प्रशासकीय यंत्रणांनी समन्वयाने काम करत दृश्य स्वरूपात कामातून बदल दिसेल, अशी कामे १५ जूनपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश, या बैठकीत देण्यात आले.



### टी पी स्कीम रद्द करण्याच्या दृष्टीने अद्यादेश काढा

» हिंजवडी, मान, मारुंजी यासह इतर भागातील नैसर्गिक नाल्यातील पाण्याचा प्रवाह रोखणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे. नाल्याभोवती उभारण्यात आलेल्या बांधकामांचा सर्वे करून संबंधित बांधकामे अधिकृत आहेत की अनधिकृत याचा अहवाल तातडीने सादर करून अनाधिकृत बांधकामे तातडीने पाडण्याचे निर्देश महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी बैठकीत दिले. यासह काही कंपन्या दूषित पाणी नाल्यात सोडत असल्यामुळे नागरिकांना त्रास होतो. अशा कंपन्यांची चौकशी करून त्यांची बांधकामे अनधिकृत असेल यासह शासनाच्या नियमांचे उल्लंघन करत असेल तर त्यांच्यावर कारवाई करून त्यांचा पाणी व वीजपुरवठा खंडित करण्याचे निर्देश यावेळी महानगर आयुक्त डॉ. म्हसे यांनी दिले.

या बैठकीला आमदार शंकर मांडेकर, पीएमआरडीएच्या विकास व परवानगी विभागाचे संचालक सुनील मरळे, मुख्य अभियंता रिनाज पठाण, जमीन व मालमत्ता विभागाचे सह आयुक्त हिम्मत खराडे, अनधिकृत बांधकाम व निर्मूलन विभागाच्या उपजिल्हाधिकारी डॉ. दीप्ती सूर्यवंशी – पाटील यांच्यासह एमआयडीसी, एमपीसीबी, पुणे आयटीसीटी मेट्रो रेल लि., जिल्हा परिषद, एमएसईडीसीएल, हिंजवडी इंडस्ट्रियल असोसिएशन, पीसीएमसी, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंजवडीतील कंपन्यांचे प्रतिनिधी, सोसायट्यांचे पदाधिकारी, एमएसईटीसीएल, वाहतूक पोलीस, हिंजवडी, मान, मारुंजी या ग्रामपंचायतीचे सरपंच यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# प्रताप सरनाईकांचा थेट धडाका

## महामार्गावरील हॉटेल थांब्यांची झाडाझडती; अनियमितांवर कारवाईचा बडगा

**पुणे | प्रतिनिधी**

परिवहन मंत्री आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी आपल्या पंढरपूर दौऱ्यात पुणे – सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील एसटीच्या अधिकृत हॉटेल थांब्यांवर अचानक भेट दिली. ही भेट कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय झाल्याने एसटीचे कर्मचारी आणि हॉटेल चालकांची चांगलीच तारांबळ उडाली.

सरनाईक यांनी प्रवाशांशी थेट संवाद साधत अन्नपदार्थांची गुणवत्ता, दर, तसेच 'एसटी नाश्ता योजना'चा योग्य अंमल होत आहे का, याची सखोल चौकशी केली. या चौकशीदरम्यान काही ठिकाणी अन्न पदार्थ बिनचव, बासी आणि अपेक्षेपेक्षा महाग असल्याच्या तक्रारी समोर आल्या.

याच वेळी महिला प्रवाशांनी प्रसाधनगृहातील अत्यंत गलिच्छ स्थितीबाबत तक्रारी केल्या. त्या ऐकताच सरनाईक यांनी संताप व्यक्त करत संबंधित हॉटेल मालकाला तात्काळ दुरुस्ती करा, अन्यथा हा थांबा रद्द करण्याचे आदेश देण्यात येतील, असा ठाम इशारा दिला. सरनाईक यांनी संबंधित हॉटेल मालकांना स्पष्ट शब्दांत बजावले की, ठराविक मुदतीत त्रुटी दूर केल्या नाहीत, तर हॉटेल थांबा कायमस्वरूपी बंद करण्यात येईल.

स्थानिक नागरिक आणि प्रवाशांनी सध्याच्या असुविधांची तक्रार करत म्हटले की, बसस्थानक सखल भागात असल्याने पावसाळ्यात येथे पाणी साचते. परिणामी प्रवाशांना मोठी गैरसोय होते. त्याचप्रमाणे, सध्या वापरात असलेले प्रसाधनगृहे देखील अत्यंत गलिच्छ, अर्धवट आणि प्रवाशांसाठी अपुरे असल्याची तक्रार करण्यात आली. या समस्येचे गांभीर्य लक्षात घेत सरनाईक यांनी महामंडळाच्या बांधकाम विभागाचे महाव्यवस्थापक दिनेश महाजन यांच्याशी थेट संपर्क साधून भिगवण येथे नवीन बसस्थानक उभारण्याची प्रक्रिया त्वरीत सुरू करा. निविदा तात्काळ प्रसिद्ध करा, अशा सूचना दिल्या.

या थांबे पुणे विभागाच्या अखत्यारीत येतात. त्यामुळे सरनाईक यांनी पुणे विभाग नियंत्रकांशी थेट संवाद साधत, एक महिन्यात सर्व त्रुटींचे निवारण झाले पाहिजे असे स्पष्ट निर्देश दिले.



### अनधिकृत थांब्यांवर बस थांबवल्यास कारवाई

**» दौऱ्यादरम्यान भिगवणजवळील एका अनधिकृत हॉटेल थांब्यावर एसटीच्या अनेक बसेस थांबलेल्या आढळून आल्या. सरनाईक यांनी तिथे अचानक भेट दिली असता, अत्यंत गलिच्छ व अस्वच्छ जागी प्रवाशांना जेवण देण्यात येत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. या प्रकाराने संतप्त झालेल्या सरनाईक यांनी अशा ठिकाणी एसटी बस थांबवणे पूर्णपणे निषिद्ध आहे.प्रवाशांच्या आरोग्याशी खेळ खपवून घेतला जाणार नाही, असे ठणकावले. त्यांनी संबंधित चालक-वाहकांवर कारवाईचे आदेश दिले. तसेच एसटी अधिकाऱ्यांना अशा थांब्यांची नियमित तपासणी करण्याचे आदेशही दिले.**

### भिगवणला लवकरच नवीन, प्रशस्त बसस्थानक

**» पंढरपूर दौऱ्याच्या दरम्यान सरनाईक यांनी महामार्गावरील भिगवण बसस्थानकालाही भेट दिली. या ठिकाणी स्थानिक नागरिक आणि प्रवाशांनी सध्याच्या असुविधांची तक्रार करत म्हटले की, बसस्थानक सखल भागात असल्याने पावसाळ्यात येथे पाणी साचते. परिणामी प्रवाशांना मोठी गैरसोय होते. त्याचप्रमाणे, सध्या वापरात असलेले प्रसाधनगृहे देखील अत्यंत गलिच्छ, अर्धवट आणि प्रवाशांसाठी अपुरे असल्याची तक्रार करण्यात आली. या समस्येचे गांभीर्य लक्षात घेत सरनाईक यांनी महामंडळाच्या बांधकाम विभागाचे महाव्यवस्थापक दिनेश महाजन यांच्याशी थेट संपर्क साधून भिगवण येथे नवीन बसस्थानक उभारण्याची प्रक्रिया त्वरीत सुरू करा. निविदा तात्काळ प्रसिद्ध करा, अशा सूचना दिल्या. त्यामुळे येत्या काही महिन्यांत भिगवणला एक आधुनिक, स्वच्छ व सुविधा असलेले नवीन बसस्थानक मिळेल, असा आशावाद येथे व्यक्त होत आहे. प्रवाशांना दिलासा देणाऱ्या या निर्णयाचे स्थानिक स्तरावर स्वागत होत आहे.**

# असे काम केले तर कारखाना टिकेल का ? रंजन तावरे यांचा सत्ताधारी अजित पवार गटांवर घणाघात

## माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत अजित पवार यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने विरोधकांकडून टीका

**पुणे | प्रतिनिधी**

माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत राज्याची भूमिती अजित पवार यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने विरोधकांकडून अजित पवार यांच्यावर सडकून टीका केले जात आहे. मुख्यमंत्री व्हायचं, ते माळेगावच्या निवडणुकीत अर्ज भरला. कारण कामकाजच एवढे चुकीचे की, संचालक सभासदांसमोर समोर जाऊ शकत नाहीत. यावर्षीची माळेगावची निवडणूक ऐतिहासिक आहे. लोक कोणताही दबाव आणि कोणतीही सत्ता समोर असली तरी परिवर्तन होणार असल्याचा विश्वास माळेगावची माजी चेअरमन रंजन तावरे यांनी व्यक्त केला.

सहकार बचाव पॅनलच्या माध्यमातून गुरु शिष्यांची जोडी माळेगावच्या रणांगणात उतरली आहे. निवडणुकीच्या प्रचारात गावोगावी सभा घेतल्या जात आहेत. माळेगाव कारखान्याच्याबाबत अजित पवार यांचे धोरण कसे चुकीचे आहे, हे सभासदांना सांगितले जात आहे.

रंजन तावरे म्हणाले की, सरासरी ११.७९ साखर उतारा असताना आम्ही राज्यातील सर्वोच्च दर दिला.आज तोच कारखाना निचांकी स्तरावर नेला. आज ४२ वर्ष झाली, गेल्या ४० वर्ष कधीच डिस्टलीवर कर्ज काढले नव्हते. ३३ कोटींच्या डिस्टीलरीवर यांनी १०० कोटींचे कर्ज काढले. २८ वर्षे मी तिथे आहे. कधीच कर्ज काढले नव्हते. त्यांनी मात्र १०० कोटी कर्ज काढले. मध्यंतरी पीडीसीसी बँकेचे कर्ज काढले. २०० रुपयांसाठी आता कर्ज काढले आहे. माळेगावच्या उसाचे पैसे वजनानुसार आणि योग्य व्यक्तीलाच मिळाले पाहिजे, मात्र, बारामतीच्या एकाच्या खात्यात पैसे आले.

त्या सभासदाचा त्या महिन्यापर्यंत ऊसच गेला नव्हता, मग पैसे कसे आले? तो सभासद प्रामाणिक होता, म्हणून कारखाना खात्यात पैसे परत गेले. मेस चालवणाऱ्याच्या नावाने १०० टनाचे पैसे जमा झाले. मग त्यांनी बोर्ड लावला. पण शेजारच्या शेतकऱ्यांना चांगले माहीत होते की, त्यांचा ऊस नेमका कसा आहे. मग यांच्या उसाला एवढे टन कसे उत्पादन कसे काढले? कोणाचा ऊस कोणाच्याही नावाने जातोय. असे काम झाले तर कारखाना टिकेल का, असा सवाल त्यांनी यावेळी केला.





### २०० कामगार बाहेर, पगार कारखान्याचा

**» ते म्हणाले की, २०० कामगार बाहेर जातात आणि पगार मात्र कारखान्याचा घेतात. निर्यातीची साखर २८०० रुपयांनी विकली. मात्र, परवानगी घेईपर्यंत ही साखर महागली. साखर यांचेच बगलबच्चे खरेदी करतात. शेतकऱ्यांचा घामाचा माल कमी दराने विक्री करू देणार नाही म्हणून इशारा दिला. साखर विक्री थांबवली. राज्यातील १७-१८ कारखान्यांनी साखर विक्री केली.**

### माळेगावरील संकट दूर करा

**» आसवनीचा ५ लाख प्रतिलिटरचा प्लॅंट लावायचा ठरले. याला संचालक विरोध करीत होते. १५५ कोटींचा प्लॅंट नेत्यांच्या आदेशाशिवाय काही करायचेच नाही, असं त्यांनी ठरवलंच होते. माझ्या शेतकऱ्यांना दोन पैसे जास्त द्यावे, असे का वाटत नाही, माळेगावची छत्रपतीसारखी स्थिती करू देऊ नका. माळेगावमध्ये तुम्ही दोन वेळा इतिहास घडविला. आता मात्र, मोठे संकट आहे.**